**CNR No. :- MHSI100003092018**

**–: नियमित दिवाणी मुकदमा क्र. ३८/२०१८ :–**

**–: निशाणी ८७ वरील आदेश :–**

वादीने प्रस्तुतचा अर्ज मयत वादी क्र. ६ च्या कायदेशीर वारसांना अभिलेखासदरी घेण्यासाठी झालेला विलंब माफ करण्यासाठी केलेला आहे.

०२. प्रस्तुत अर्जात वादी यांनी असे कथन केले आहे की, सदर दाव्यातील वादी क्र. ६ सुभद्रा अर्जुन ठाकुर ही दि.१४.०४.२०२३ रोजी मयत झालेली आहे. तिचे वारस वादी क्र. ७ ते ११ ही यापुर्वीच सदर दाव्यात सामील आहेत. त्यामुळे वादी क्र. ६ चे नाव कमी करणे आवश्यक आहे. सदर दाव्याच्या न्यायपुर्ततेकामी वादी क्र. ६ चे नावासमोर मयत असे नमुद करुन वादी क्र. ६ हिचे नाव कमी करायचे आहे. वादी क्र. ६ ही मुंबई येथे मयत झाल्याने तिचा मृत्यु दाखला वेळीच उपलब्ध न झाल्याने सदर नाव कमी करण्यास व तिचे वारस अभिलेखावर आणण्याकामी दि.१३.०७.२०२३ पासून आजपर्यंत २ महिन्यांचा विलंब झालेला आहे. सबब वारस म्हणुन सामील होण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज मंजुर करण्यास तीव्र आक्षेप नोंदविला तसेच अर्ज खोटा व खोडसाळ असल्याने नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. उभय विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०५. दाव्याचे स्वरुप पाहता वादी क्र.६ चे वारस अभिलेखावर येणे आवश्यक आहे. वादी यांनी वारस अभिलेखावर आणण्यासाठी विलंब केलेला आहे. त्यामुळे प्रतिवादीचा व परीणामी न्यायालयाचा अमुल्य वेळ व्यर्थ गेलेला आहे. परंतु, केवळ विलंब झाला म्हणुन वादी क्र.६ यांचे वारस अभिलेखावर सादर करण्याची उचित संधी नाकारणे हे नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन होणारे नाही. अर्ज नामंजूर झाल्यास अर्जाच्या अनुषंगाने विविध कायदेशीर कामे चालविण्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी न्यायपुर्ततेकामी वारस अभिलेखावर आणण्यास झालेल्या विलंबाचे खर्चाच्या स्वरुपात परिमार्जन करुन अर्ज मंजूर करणे उचित वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश करणेत येत आहे.

**–:: <u>आदेश</u> ::–**

१. रक्कम रु. ३००/– (रुपये तीनशे मात्र) खर्चाचे आदेश करुन निशाणी क्र. ८७ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. रक्कम रु. ३००/– (रुपये तीनशे मात्र) भरल्यानंतर वादी क्र.६ चे वारसांना अभिलेखासदरी घेण्यासाठी झालेला विलंब क्षमापीत करणेत येत आहे.

३. सदरची रक्कम रु.३००/– (रुपये तीनशे मात्र) मोफत विधीसेवा प्राधिकरण (Free Legal Aid) कडे जमा करणेत यावी.

सही/–***

ठिकाण – दोडामार्ग. (वाय. पी. बांवकर)

दिनांक – २७.०२.२०२४. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) दोडामार्ग.